**नि.क्र. ५६   खाली** | | **नि.दि.दा. क्र. २९८/२०१२**
**पदमा –वि–चेअरमन वाशिम बँक**

**वादीतर्फे अधिवक्ता श्री. व्ही.पी.देशपांडे यांचे मार्फत वादीचा  सरतपास शपथेवर सुरु:–**

मी प्रतिज्ञार्थी साक्षीदार शपथेवर कथन करते की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझ्या सांगीतल्याप्रमाणे लिहीण्यात आला आहे. तो खरा आहे. तो मी वाचला आहे, समजुन घेतला आहे व त्यावर मी वाचुन समजुन सही केली आहे.

आता मला  दिनांक १५/०३/२००४ चे खरेदीपत्र दाखविण्यात आले ते रजिस्टर असून त्यावर प्रतिवादी क्र.४ व त्यांचे पती जुगलकिशोर बजाज व दोन साक्षीदार यांच्या सहया आहे, त्या सहया माझ्या समक्ष झाल्या आहेत त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास नि. **निशाणी ५७** देण्यात येते.  डीड ऑफ अपार्टमेंटची मूळ प्रत मी दाखल केली आहे. त्यावर फ्लॅट बांधणारा व विकणारा म्हणजेच प्रतिवादी क्र. ४ व त्यांचे पती यांच्या सहया आहेत. त्यास निशाणी **५८** देण्यात येते. माझ्या मालकीची मालमत्ता लिलावामध्ये निघाली असल्याबाबतची माहिती मला दैनिक मातृभूमी वर्तमान पत्रातून मिळाल्यावर आम्ही पेपर विकत घेऊन तो दाखल केला सदरचे वर्तमान पत्रास निशाणी **५९** देण्यात येते. त्यानंतर मी कलम १६४ महाराष्ट्र सहकार अधिनियम कायदयान्वये प्रतिवादी बँकेला नोटीस दिली त्यावर माझ्या वकिलांचीच सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या नोटीसची कार्यालयीन प्रतीस निशाणी **६०** देण्यात येते. प्रतिवादींना नोटीस मिळाल्याबाबतची पोच **नि.६१** वर आहे. सहकार आयुक्त सहकारी संस्था यांनी जिल्हा उपनिबंध सहकारी संस्था यांनी जे पत्र पाठविले कि, वादीने जी नोटीस पाठविली त्यावर कार्यवाही करा त्या पत्रावर सहकार आयुक्तांची सही आहे ती **नि.६२** वर आहे.

**उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**समक्ष**

RAJENDRA TUKARAM GHOGLE

Digitally signed by RAJENDRA TUKARAM GHOGLE
Date: 2026.01.21 10:43:13 +0530

दिनांक :– २०/०१/२०२६

(आर. टी. घोगले)
८ वे सह दि.न्या.व.स्तर, अमरावती.